**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६८/२०२५**

लिलाबाई व इतर **– वि.–** कोणी नाही

CNR No.- MHCH070013742025

## निशाणी क्रमांक ०१ वर आदेश

१. अर्जदारांनी प्रस्तूतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन अधिनियम, १८२७ चे कलम–२ नुसार वारस प्रमाणपत्र (Heirship certificate) मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार क्र.१ लिलाबाई भास्कर देवगिरकर ही मयताची पत्नी, अर्जदार क्र.२ अनिता कालीदास देऊरकर ही मयताची मुलगी व अर्जदार क्र.३ गणेश अशोक देवगिरकर हा मयताचा नातू (मुलाचा मुलगा) आहे. मयत **भास्कर रामचंद्र देवगिरकर** यांचे दि.१२/०३/१९९९ रोजी बरांज (मो), तह. भद्रावती, जि.चंद्रपूर येथे निधन झाले आहे. मयताचे आई–वडील सुध्दा पुर्वीच मरण पावले आहेत. मयत भास्कर रामचंद्र देवगिरकर यांचा अशोक भास्कर देवगिरकर हा मुलगा होता व तो दि.२१/११/२००२ रोजी मयत झाला. मयत अशोक भास्कर देवगिरकर यांची रेखा अशोक देवगिरकर ही पत्नी असून तिने पुर्नविवाह केला असून तिचे नाव रेखा हनुमंत तेलतुंबडे असे आहे. अर्जदार क्र.३ गणेश अशोक देवगिरकर हा मयत अशोक भास्कर देवगिरकर यांचा एकमेव मुलगा आहे. मयतास उपरोक्त वारस असून इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांनी शासकीय कामकाजाकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

३. सदर प्रकरणात कोणाची काही हरकत आहे का ? याबाबत जाहीर प्रगटन निशाणी क्र.१६ वर 'दैनिक मराठी महाविदर्भ' या वर्तमानपत्रात दि.२ ऑक्टोबर, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आले होते. परंतु, अद्याप सदर प्रकरणात कोणाचीही काहीएक हरकत प्राप्त झाली नाही.

४. अर्जदार क्र.२ अनिता कालीदास देऊरकर यांनी अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ निशाणी क्र.११ वर पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. अर्जदाराने सदर शपथपत्रामध्ये प्रस्तुत अर्जातील संपूर्ण मजकुराचा समावेश केलेला आहे. उपरोक्त वारसदार हेच मयताचे एकमेव वारस आहेत व त्यांच्याशिवाय इतर वारस नाहीत, असे नमुद केले आहे. अर्जदाराने मयताचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रत नि.क्र.१८ वर दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत **भास्कर रामचंद्र देवगिरकर** यांचे

दि.१२/०३/१९९९ रोजी मौजा–बरांज मोकासा, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर येथे निधन झाले आहे. तसेच त्यांचा कायम स्वरुपी पत्ता देखील मौजा–बरांज मोकासा, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर असा आहे. अर्जदाराने नि.क्र.१२ वर दाखल केलेल्या मृतकाचा मुलगा अशोक भास्कर देवगिरकर याचे मृत्यू प्रमाणपत्राची पडताळणी प्रतीवरुन तो दि.२१/११/२००२ रोजी मृत पावल्याचे दिसून येते. अर्जदाराने नि.क्र.१३ ते १५ वर अर्जदार क्र.१ ते ३ यांच्या आधार कार्डच्या पडताळणी प्रती, पेपरमध्ये प्रकाशीत जाहीरनाम्याचे बिल नि.क्र.१७ वर दाखल केले आहे.

अर्जदारातर्फे सा.क्र.२ विठ्ठल माणिकराव पुनवटकर यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.१९ वर दाखल करुन ते अर्जदारांना ओळखत असल्याचे, ते त्यांचे शेजारी असल्याचे, अर्जदार क्र.१ चे पती भास्कर रामचंद्र देवगिरकर यांचा दि.१२/०३/१९९९ रोजी बरांज मोकासा येथे मृत्यू झाल्याचे तसेच मयताची आई भारती रामचंद्र देवगिरकर ही बरांज मोकासा येथे तिस वर्षापुर्वी मृत पावल्याचे शपथेवर कथन केले आहे.

अर्जदारातर्फे सा.क्र.३ रेखा हनुमंत तेलतुंबडे यांनी त्यांचे पुराव्याचे शपथपत्र नि.क्र.२१ वर दाखल करुन भास्कर रामचंद्र देवगिरकर यांचा दि.१२/०३/१९९९ रोजी बरांज मोकासा, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर येथे मृत्यू झाल्याचे तसेच तिचे पती अशोक भास्कर देवगिरकर यांचा दि.२१/११/२००२ रोजी भद्रावती, तह.भद्रावती, जि.चंद्रपूर येथे मृत्यू झाल्याचे शपथेवर कथन केले आहे. त्यांनी त्यांचे पती अशोक भास्कर देवगिरकर यांच्या मृत्यूनंतर श्री.हनुमंत तेलतुंबडे यांचेशी पुर्नविवाह केला असुन आता त्यांचे नाव सौ.रेखा हनुमंत तेलतुंबडे असे असल्याचे व अर्जदार क्र.१ ते ३ हेच त्यांचे वारस असल्याचे व त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कुणीही वारस नसल्याचे शपथेवर कथन केले आहे. अर्जदाराने नि.क्र.२० वर पुरसीस दाखल करून पुरावा बंद केला आहे.

५. अर्जदाराने दिलेल्या पुराव्यास कोणीही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे अर्जातील कथनावर अविश्वास ठेवण्याचे कोणतेही कारण नाही. उपरोक्त वारसदारांचे मयताशी असलेले नातेसंबंध विचारात घेता असे दिसून येते की, उपरोक्त वारसदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्ज मंजूर करणे योग्य व न्यायोचित आहे. सबब, मी पुढील आदेश करीत आहे;

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१६८/२०२५**

लिलाबाई व इतर **– वि.–** कोणी नाही

CNR No.- MHCH070013742025

**आदेश**

१) अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) अर्जदार क्र.१ **लिलाबाई भास्कर देवगिरकर**, अर्जदार क्र.२ **अनिता कालीदास देऊरकर** व अर्जदार क्र.३ **गणेश अशोक देवगिरकर** हे मयत **भास्कर रामचंद्र देवगिरकर** यांचे वारस असल्याचे घोषीत करण्यात येते.

३) सिव्हील मॅन्युअल प्रकरण–१४ मधील परिच्छेद–३१२ प्रमाणे मूळ वारस प्रमाणपत्रावर टीप नमूद करावी.

४) अर्जदाराने आवश्यक ते मुद्रांक शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर केला असे.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by JARUDE ASHWINI SHRIKANT
Date: 2026.04.04 10:31:54 +0530

**(ए.एस. जरुदे)**

दिनांक:– ३१/०३/२०२६ दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), भद्रावती